# प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - २८/०९/२०१८

**वानवडी पोलीसांनी सराईत वाहन चोरास पकडुन त्याचेकडुन पुणे शहरातील वाहनचोरीच्या गुन्ह्यांची उकल**

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर कडील अधिकारी व कर्मचारी यांनी आरोपी नामे (१) रविंद्र उर्फ वकाशा बाळासाहेब भोसले, वय २२ वर्षे रा.तरवडेवस्ती पाण्याच्या टाकीजवळ, दत्ता सोनवणे यांचे घरी महंमदवाडी हडपसर पुणे मुळ गाव मु.पो.अकलुज, जुना सराटी रोड राऊतनगर वडा ता.माळशिरस जि.सोलापुर, (२) अक्षय ऊर्फ बोंड्या बाळासाहेब सोनवणे वय १९ वर्षे रा.साठेनगर, तरवडेवस्ती महंमदवाडी हडपसर पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण १,२५,०००/- रुपये किमतीची ०५ दुचाकी वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.शि.नासीर देशमुख यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, सराईत वाहन चोर नामे रविंद्र उर्फ वकाशा बाळासाहेब भोसले व त्याचा साथीदार नामे अक्षय ऊर्फ बोंड्या बाळासाहेब सोनवणे हे पाण्याच्या टाकीजवळ, तरवडेवस्ती, हडपसर पुणे येथे येणार आहे त्या अनुषंगाने वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन ते दिसताच त्यांना ताब्यात घेण्यात येवुन वानवडी पोलीस ठाणे येथे आणुन, विश्वासात घेवुन अधिक चौकशी केली असता त्यांनी वानवडी पोलीस ठाणेकडील ०२ वाहन चोरी, हडपसर, कोंढवा, कोरेगाव पार्क पोलीस ठाणेकडील प्रत्येकी १ वाहन चोरी असे एकुण ०५ वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे कबुल करुन त्यांचेकडुन एकुण १,२५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल दाखल गुन्ह्याचे पुरावेकामी जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री प्रकाश गायकवाड साो, परिमंडळ-५ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री मिलिंद पाटील साो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे साो, मा.पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री रावसाहेब भापकर, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री आसाराम शेटे, सहा.पोलीस फौजदार श्री रमेश भोसले, पो.हवा.निसार खान, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.नवनाथ खताळ, पो.शि.सुधीर सोनवणे यांच्या पथकाने केली.


वानवडी पोलीस ठाणे
पुणे शहर